<u>मालेगांव येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ता. मालेगांव, जि. वाशिम</u>

<u>यांचे न्यायालयात आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा</u>

[ <u>पिठासन अधिकारी – प्रविण उ. कुळकर्णी</u> ]

**<u>संक्षिप्त फौ.ख.क्र. ४३९/२०२४</u>** **<u>निशाणी– ०४</u>**

१. अपराध घडल्याचा दिनांक : १२.०३.२०२४

२. दोषारोप दाखल तारीख : ०३.०६.२०२४

३. फिर्यादीचे नांव व पत्ता : **सरकारतर्फे**, **<u>शिरपुर</u>** पोलीस ठाणे, ता.मालेगांव.

४. आरोपीचे नांव, **गजानन शंकर घोडके,**
रा. शिरपुर, ता. मालेगांव, जि. वाशिम.

६. गुन्ह्याचा तपशील :

तुम्ही आरोपीनी दि.१२.०३.२०२४ रोजी ग्राम **शिरपुर,** ता. मालेगांव **येथे सार्वजनिक ठिकाणी** स्वतःचे फायद्यासाठी विनापरवाना बेकायदा वरली मटक्याच्या आकड्यावर पैसे लावून ताश पत्ते जुगार खेळतांना जुगाराचे साहित्य साधनांसह व एकूण रोख **रक्कम रु.७३०/–** सह मिळुन आला म्हणुन त्याद्वारे मुंबई जुगार कायदा कलम **१२ (अ)** खाली शिक्षापात्र अपराध व हया न्यायालयाचे दखलगिरीत येणारा अपराध केला आहे.

**आरोपीचे प्रतिकथन –**

प्र.१. तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्यात का ?

उ. होय.

प्र.२. आता तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप वाचुन दाखविला तो तुम्हाला समजला का?

उ. होय.

प्र.३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

उ. **होय, गुन्हा कबुल आहे.**

**आरोपीची सही**

———————————

दिनांक – २८.०९.२०२४. **(प्रविण उ.कुळकर्णी)**

ठिकाण – मालेगांव **प्र.**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१), मालेगांव.

# <u>न्या य नि र्ण य</u>

(न्यायनिर्णय घोषीत दिनांक २८.०९.२०२४)

०१. सदर प्रकरणात आठ आरोपी न्यायालयासमोर हजर असून आरोपीने **<u>नि.क्र.०३</u>** खाली पुर्सिस दाखल केली व त्यात गुन्हा कोणत्याही दबावास बळी न पडता गुन्हा स्वेच्छेने कबूल करीत असल्याचे कथन केले. आरोपीने दाखल केलेल्या पुर्सिसची व न्यायालयात प्रत्यक्ष पडताळणी केली. यावरून आरोपी स्वेच्छेने गुन्हा कबूल करीत असल्याची खात्री झाली.

०२. आरोपींविरुध्द सदरचे प्रकरण मुंबई जुगार कायदा कलम **१२(अ)** अन्वये गुन्हा केल्याबाबत दाखल करण्यात आलेले आहे. आरोपीने कोणत्याही दबावाखाली न येता स्वतःहुन गुन्हा कबुल केला आहे. मी आरोपीने गुन्हा कबुल केल्यानंतर होणा–या शिक्षेबाबत सविस्तर सांगितले. आरोपीने असे कथन केले आहे की, त्यांच्या हातुन पहिल्यांदाच गुन्हा घडला आहे, अर्थिक परिस्थिती गरीबीची असुन कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. प्रस्तुतच्या प्रकरणाची हकिकत पाहिली असता, अपराधाचे स्वरुप व सर्व परिस्थिती लक्षात घेऊन आरोपींना पुन्हा एकदा सुधारण्याची संधी देणे गरजेचे ठरते. त्यामुळे परिवीक्षा अधिनियम १९५८ नुसार आरोपीस भविष्यात चांगले वर्तन ठेवण्याचे समज देऊन दंडाची शिक्षा देणे न्यायाचे होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपीला मुंबई जुगार कायदा कलम **१२(अ)** अन्वयेच्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात येते. त्याना रक्कम **रु.२००/–** द्रव्यदंडाची शिक्षा व कोर्ट उठेपर्यंत कारावसाची शिक्षा ठोठाविण्यात येते, दंड न भरल्यास त्यांना १० दिवसांचा साधा कारावास भोगावा लागेल.

२. आरोपीने जामीन दिलेला नसल्याने त्यावर आदेश नाही.

३. जप्त मुद्येमाल रोख रक्कम **रु.७३०/–** हे अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावे व जुगाराचे साहित्य मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

४. आरोपीने दंडाची रक्कम भरल्यावर त्यांना त्वरीत मुक्त करण्यात यावे.

दिनांक – २८.०९.२०२४

ठिकाण – मालेगांव

**स्वा/–**

**(प्रविण उ.कुळकर्णी)**

**प्र.**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१),
मालेगांव.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Order **:-**

| | | |
|---|---|---|
| 1. Name of the Stenographer | **:-** | **Shri.C. R. Lande (LG)** |
| 2. Court Name | **:-** | CJJD & JMFC, Malegaon |
| 3. Order dated | **:-** | 28.09.2024 |
| 4. Order Signed by the P.O. | **:-** | 28.09.2024 |
| 5. Order uploaded on | **:-** | 01.10.2024 |